# अपराजिता

सौ. शोभा सतीश राऊत

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

B 284

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**अपराजिता : सौ. शोभा सतीश राऊत**

© **सौ. शोभा सतीश राऊत**
'शब्दांगण', प्लॉट नं. १७,
जरगनगर, कोल्हापूर.
फोन : (०२३१) २६३७७७८, मो. ९९२३८९७८९८

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
पहिली आवृत्ती- १९९१, दुसरी आवृत्ती- २००३,
तिसरी आवृत्ती- २९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ १७०/-

---

(या कादंबरीतील सर्व पात्रे व प्रसंग काल्पनिक आहेत. वास्तवाशी मेळ जमल्यास तो केवळ योगायोग समजावा.)

# अपराजिता

केरळमधून आलेले आणि आता
कोल्हापूरला आपली कर्मभूमी माननारे,
आमचे कौटुंबिक मित्र दांपत्य
श्री. अच्युत पणिकर व सौ. सुमन अ. पणिकर
यांना सस्नेह भेट

# मनोगत

माझ्या रसिक मित्र-मैत्रिणींनो,

अपराजिता कादंबरीची तिसरी आवृत्ती निघत आहे. ती केवळ माझ्या लिखाणावरील तुमच्या उदंड प्रेमामुळेच. असेच उदंड प्रेम पुढेही आपण करीत राहाल ही आशा बाळगते.

अपराजिता मधील विजयाबाईंची व्यक्तिरेखा आलेल्या संकटांना निकराने लढा देते- ती कधी परिस्थितीशी झगडते, कधी समाजाशी झुंजते तर कधी स्वकियांमुळे दुखावली जाते.

आयुष्यात संघर्ष अटळ आहे. संघर्षाला सामोरे जाणं-लढणं-जिंकणं हेच खरे जीवन! अपराजितामध्ये तुम्ही हेच जीवनमूल्य अनुभवाल. अपराजिता तुम्हाला कशी भावली हे कळवालच.

**सौ. शोभा सतीश राऊत**

# १

''मम्मी ऽऽ ए मम्मी...''

सुजाताचा आवाज ऐकून शैलाताई बाहेरच्या खोलीत आल्या.

''सुजू, अगं, आज एवढा वेळ का झाला तुला?...''

''मैत्रिणींबरोबर बोलण्यात थोडा वेळ जास्तच गेला ग....''

''अगं, पण आज मला लवकर जायचे होते. त्यात त्या राधाबाईही आल्या नाहीत...''

''सॉरी हं! मम्मी, तू त्या राधाबाईंना कामावरून काढून का टाकत नाहीस?''

''सुजू, अगं आजकाल घरकामाला नोकर माणसे मिळतात कुठे? आपल्याला गरज. आपणच सांभाळून घ्यायचे त्यांचे नखरे. दुसरं काय? बरं मी निघते. तू जेवून घे.''

शैलाताई लगबगीने घराबाहेर पडल्या. सुजाता बराच वेळ तशीच बसून राहिली. उठून जेवून घ्यावे असेही तिला वाटेना. घरातला एकटेपणा तिला नकोसा होत होता. आणि एकटं जेवण तर त्याहून नको. घरात राधाबाई असल्या म्हणजे निदान घरात दुसरं कोणीतरी आहे ही जाणीव असते. एकटं असले तरी एकाकी वाटत नाही.

पप्पांचा वेळ तर घरापेक्षा घराबाहेरच जास्त जातो. एवढा मोठा बिझनेस सांभाळायचा म्हणजे त्यांची कामेही जास्तच आणि मम्मीही त्यांना किती मदत करते. आपल्या मम्मीच्या मदतीने पप्पांचा व्यवसाय मोठा झाला, पसरला. पप्पांनीच सांगितले होते आपल्याला. हो, आणि तेव्हा म्हणे आजीही होती आपली. जी

ठामपणे मम्मीच्या पाठीशी उभी राहिली. घरची आघाडी ती व्यवस्थितपणे सांभाळत होती आणि म्हणूनच मम्मी पप्पांच्या बरोबरीने काम करीत होती. हळूहळू परिस्थिती बदलायला लागली. दोन वर्षांनंतर आपला जन्म झाला. आजीने म्हणे मोठ्या हौसेने आपलं नाव सुजाता ठेवलं. आपण सहा वर्षांच्या झालो आणि आजी गेली. मुलाचा समृद्धीचा संसार पाहूनच तिने या जगाचा निरोप घेतला.

पण आता खरंच फार एकाकी वाटतं आपल्याला घरात. आपल्या पाठीवर झालेला भाऊ आज असता तर? मम्मी-पप्पांनी कसं सहन केले असेल ते दुःख? त्यांच्या नशिबी मुलगा नव्हता आणि आपल्या नशिबी भाऊ नव्हता. हे असं एकाकी जीवन!

सुजाता न जेवता कॉटवर लवंडली तोच कॉलबेलचा आवाज घरभर घुमला. ''आता या वेळचं कोण असेल?'' विचार करीत सुजाताने दार उघडले. समोर एक पोक्त बाई उभी होती.

''कोण पाहिजे आपल्याला?'' त्या अपरिचित बाईकडे पाहात सुजाताने प्रश्न केला.

''तुम्हालाच शोधत आले आहे...''

''मला?''सुजाताला फार आश्चर्य वाटले होते. ह्या बाईचे आपल्याकडे काय काम असणार?

''या ऽ आत या...''

''नको, आत येत नाही. तुम्हाला शोधण्यात माझा बराच वेळ मोडलाय....तुमची एक वस्तू परत करायला आलेय...देते हं.''

त्या बाईने पिशवीत हात घातला. सुजाता विचार करू लागली. माझी वस्तू? या बाईकडे? असं कसं होईल? काहीतरीच... तिचं लक्ष त्या बाईने पिशवीतून बाहेर काढलेल्या वस्तूकडे गेले आणि ती अवाक्‌च झाली.

''अय्या, माझी पर्स? तुमच्याकडे कशी आली...?''

''मघाशी तुम्ही कॉलनीच्या गेटजवळ स्कूटरवरून उतरलात तेव्हाच तुमच्या हातून पर्स पडली. मी खूप दूर होते. काहीतरी पडलंय एवढंच समजलं. जवळ आल्यानंतर लक्षात आले ही तर पर्स आहे; पण तोपर्यंत तुम्ही कुठे गेलात, काही कळलंच नाही.''